रॅग पिकर्स चे महाराष्ट्र सरकारचे पत्रक

कचरा उचलणाऱ्या श्रमजीवींना (Ragpickers) ना घरे, दुकाने व बाजार इ.ठिकाणी निर्माण होणारा कचरा उचलण्याचे काम देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन परिपत्रक क्र.घकव्य१००१/प्र.क्र.५४६/पापु -२२
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक : ५ जानेवारी, २००२

पहा : १) मा.सर्वोच्च न्यायालयाने भारतातील वर्ग-१ दर्जाच्या शहरामधे घनकचरा व्यवस्थापनाचा अभ्यासासाठी नेमलेल्या बर्मन समितीचा अहवाल
२) शासन परिपत्रक क्र.घंकव्य-१०९९/प्र.क्र.३१४/पापु-२२ दि.६ एप्रिल,१९९९
३) पर्यावरण व वन मंत्रालय, भारत सरकार यांचे नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २०००

प्रस्तावना

घनकचरा व्यवस्थापन हे स्थानिक स्वराज्य संस्थेचे महत्वाचे कार्य आहे. वाढत्या नागरीकरणामुळे शहरांमध्ये निर्माण होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचा प्रश्न नागरी संस्थांपुढे असतो. कचरा उचलणे व विल्हेवाट लावण्याची शास्त्रशुध्द सुविधा उपलब्ध नसल्यामुळे शहरात प्रदूषणाचे प्रमाण वाढून अनेक शहरामध्ये विविध साथीचे रोग उद्‌भवल्याची उदाहरणे दिसून येतात. शहरामध्ये ज्या ठिकाणी कचरा निर्माण होतो तो कचरा एका जागी साठविण्यात येत नाही. सध्या असे निदर्शनास येते की नागरीक त्यांच्याकडे निर्माण होणारा कचरा रस्त्यावर, फुटपाथवर, नाल्यात व गटारामध्ये टाकतात. तसेच शहरातील रस्ते व फुटपाथ नियमितपणे स्वच्छ करण्यात येत नाही, त्यामुळे तो कचरा त्याच ठिकाणी पडून राहतो.

घनकचरा व्यवस्थापनासंबंधात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल केलेल्या याचिकेसंबंधात सर्वोच्च न्यायालयाने भारतातील वर्ग-१ दर्जाच्या शहरामधे घनकचरा व्यवस्थापनाचा अभ्यास करुन सुधारणा करण्याबाबत शिफारस करण्यासाठी " बर्मन समिती " ची स्थापना केलेली होती. बर्मन समितीने केलेल्या शिफारशी, तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार केंद्र शासनाच्या पर्यावरण

व वन मंत्रालयाने नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, २००० निर्गमित केलेले आहेत. त्यानुसार नागरी संस्थांना शहरात निर्माण होणा-या कच-याची वर्गवारी करणे, उचलणे, साठविणे, प्रक्रिया करणे व कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी विशिष्ट कालावधीत अंमलबजावणी करावयाची आहे. केंद्रशासनाने तयार केलेल्या नियमातील तरतुदीनुसार ही कार्यवाही करणे बंधनकारक आहे.

सध्या लहान मोठया शहरामध्ये कचरा उचलणारे श्रमजीवी (Ragpickers) आहेत त्यांची उपजिवीका ते शहरातील कचरा उचलण्याचे काम करुन भागवितात. शहरातून निर्माण होणा-या एकूण कच-याच्या १० % कचरा Ragpickers द्वारे उचलण्यात येतो व मध्यस्थामार्फत कचरा प्रक्रिया करणा-या उद्योगांना विकल्या जातो असा सर्वसाधारण अंदाज आहे. त्यामुळे, नागरी संस्थांवरील कचरा उचलणे, वाहून नेणे व कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी येणारा खर्च कमी होण्यास मदत होते. कचरा उचलणा-या या गटामध्ये मुख्यत: महिला, लहान मुले व मुली असतात. शहरात निर्माण होणा-या कच-याचे व्यवस्थापन करण्याच्या अनुषंगाने बर्मन समितीने केलेल्या अनेक शिफारशीपैकी एक अशी शिफारस केली की, या लोकांचा जीवनस्तर सुधारण्यासाठी सेवाभावी संस्थेच्या (NGOs) मदतीने या कचरा उचलणा-या (Ragpickers) श्रमजीवींना संघटित करुन त्यांच्याकडून शहरातील द्वारस्तरावर कचरा उचलण्याचे काम (Door-step collection) करण्यात यावे. या Ragpickers ना संघटित करुन त्यांना शहरातील नेमून दिलेल्या भागामध्ये कचरा उचलण्याचे काम दिल्यास शहरांची स्वच्छता व नागरीकांचे आरोग्य व्यवस्थित राहण्यामधे मदत होऊ शकेल. तसेच, त्याच्याकडून उचलण्यात येणा-या कच-यापासून त्यांना चागली किंमत मिळणार असल्यामुळे त्यांचा जीवनस्तर उंचावण्यासुध्दा मदत होईल. बर्मन समितीने केलेल्या या शिफारशीच्या अनुषंगाने नागरी संस्थांना सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन परिपत्रक

शहरात निर्माण होणारा कचरा नियमित उचलणे व त्याची विल्हेवाट लावण्याच्या उपलब्ध विविध पध्दतीपैकी एक भाग म्हणून दैनंदिन निर्माण होणारा कचरा उचलणे व त्याची विल्हेवाट

लागण्यासाठी सेवाभावी संस्थांच्या मदतीने कचरा उचलणाऱ्या श्रमजीवींना (Ragpickers) संघटित करुन घरे, दुकाने, बाजार व इतर तत्सम ठिकाणाहून कचरा उचलण्याचे काम (Doorstep Collection) त्यांच्याकडून करुन घेण्यासाठी नागरी संस्थांनी खालील दिलेल्या कार्यपध्दती व सूचनांचा अवलंब करावा:-

१) शहरातील विविध भागामध्ये कचरा उचलणाऱ्या असंघटित श्रमजीवींना (Ragpickers) सेवाभावी संस्थांच्या (NGOs) मदतीने संघटित करुन त्याची विहीत पध्दतीने सहकारी संस्था स्थापन करण्यात यावी. या संस्थांची नोंदणी करण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी पुढाकार घ्यावा. नोंदणी झालेल्या कचरा उचलणाऱ्या श्रमजीवींच्या (Ragpickers) संस्थांना सेवाभावी संस्थांच्या (NGOs) मदतीने शहरातील विभाग/वार्ड प्रमाणे कचरा उचलण्याची कामे वाटून देण्यात यावी.

२) Ragpickers नोंदणीकृत सहकारी संस्थाना शहरातील विविध भागामध्ये कचरा उचलण्याचे काम देताना शहरातील नागरिकांना या व्यवस्थेची सूचना देण्यात यावी. तसेच, शहरातील सेवाभावी संस्था, प्रतिष्ठित नागरीक, महिला मंडळ व लोकप्रतिनिधी यांच्याशी विचारविनिमय करावा.

३) ज्या Ragpickers नी सहकारी संस्था स्थापन केलेली नाही अशा Ragpickers ना सुध्दा अपवादात्मक परिस्थितीत हे काम वैयक्तिक स्तरावर करण्यासाठी नागरी संस्थेमधे नोंदणी करण्यात यावी व त्यांना कचरा उचलण्याची कामे (परवानगी) देण्यात यावी.

४) शहरात निर्माण होणारा सुका कचरा (Dry Waste) उचलण्यासाठी नागरी संस्थेने Ragpickers च्या सहकारी संस्थांना प्राधान्य दयावे.

५) शहरातील दुकाने, बाजार व फेरीवाल्यांच्या संस्थांनी किंवा संघटनांनी त्यांच्या परिसरातील दैनंदिन कचरा उचलण्याचे काम Ragpickers च्या सहकारी संस्थांना दयावे. यासाठी ज्या ठिकाणी कचरा निर्माण होतो तेथे कचरा दोन कुंडयांमधे साठवून ठेवावा. पैकी एक कचराकुंडी ही अन्नपदार्थ/सेंद्रिय पध्दतीने प्रक्रिया करावयाच्या कचऱ्यासाठी (Biodegradable) आणि दुसरी पुनर्वापर होणाऱ्या कचऱ्यासाठी (Recycle/reuse) ठेवण्यात यावी. या कुंडयातील

कचरा Ragpickers नी दररोज ठरलेल्या वेळी किंवा त्यांना घंटागाडी आदी सुविधा उपलब्ध करुन तो दारस्तरावरुन जमा करण्याची सुविधा उपलब्ध होण्यास मदत करावी.

६) Ragpickers व्दारे एकत्र केल्या जाणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट ही शहरामध्ये कचराप्रक्रिया केंद्र असल्यास कचरा प्रक्रियेसाठी उपयोगात आणावा किंवा Ragpickers ना तो कचरा बाजारामधे विकण्याची मुभा देण्यात यावी. यापासून Ragpickers ना चांगले उत्पन्न प्राप्त होऊन त्यांचा जीवनस्तर उंचावण्यास मदत होईल.

७) नोंदणी करण्यात आलेल्या Ragpickers' ना नागरी संस्थेव्दारे/सेवाभावी संस्थेव्दारे (NGOs) ओळखपत्रे देण्यात यावी. जेणेकरुन नागरीकांना नोंदणी झालेल्या Ragpickers ची ओळख करता येईल.

८) नागरी संस्थेने/सेवाभावी संस्थेने नोंदणीकृत Ragpickers ना अथवा त्यांच्या संस्थांना कचरा उचलण्यासाठी एक विशिष्ट विभाग नेमून परिस्थितीनुरुप २५०-३०० घरामधून कचरा उचलण्याचे काम देण्यात यावे.

९) Ragpickers कडून जैव-वैद्यकीय (Bio-Medical) कचरा तसेच दूषित कचरा उचलण्याचे काम करुन घेण्यात येऊ नये. नागरी संस्थांनी सर्वसाधारण कचरा व जैववैद्यकीय कचरा वेगवेगळा उचलण्याची व साठविण्याची व त्याची विल्हेवाट लावण्याची स्वतंत्र व्यवस्था करावी व उचित नियंत्रण करावे.

१०) नोंदणी झालेल्या Ragpickers ना घरे, दुकाने,बाजार इ. ठिकाणाहून कचरा उचलण्याच्या कामासाठी नागरी संस्थेकडून/सेवाभावी संस्थेकडून दैनिक किंवा मासिक पगारावर औपचारीक नोकरी देण्यात येऊ नये. तसेच सेवाभावी संस्थेने (NGOs) Ragpickers ना नोकरी देणारा नियोक्ता (Agent) म्हणून काम न करता फक्त Ragpickers ची सामाजिक व आर्थिक स्थिती सुधारण्यामध्ये मदत करण्याचा उद्देश ठेवावा.

११) Ragpickers ना अथवा त्यांच्या संस्थांना घराच्या दारावरुन कचरा उचलण्याचे (Doorstep Collection) काम पूर्ण किंमत-मोबदला (Full-cost-recovery) नुसार

कंत्राटी पध्दतीनेही देण्यात यावे. कचरा उचलण्यासाठी दयावयाचा मोबदला नागरी संस्था व Ragpickers च्या संस्थेने योग्यरितीने ठरवावा.

१२) एखादया नागरी संस्थेकडे कचरा घराच्या दारावरुन (Doorstep Collection) नियमित उचलण्याची स्वत:ची पध्दत अस्तित्वात असल्यास Ragpickers ना कचरा उचलण्याचे काम देणे बंधनकारक नाही. मात्र त्यामध्ये या Ragpickers ना सुध्दा काही काम देता आले व नागरी संस्थांना स्वत:च्या कर्मचा-यावरील खर्च कमी करता आला तर तसे प्रयत्न जरुर करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

५.१.२००२
(बी.सी.खटुआ)
सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा.मंत्री (पा.पु व स्व.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुबंई
२. मा.राज्यमंत्री (पा.पु व स्व.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुबंई
३. मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक
४. प्रधान सचिव (न.वि.वि) यांचे स्वीय सहाय्यक
५. सदस्य सचिव (राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ) यांचे स्वीय सहाय्यक
६. सचिव (सामाजिक न्याय विभाग) मंत्रालय, मुबंई यांचे स्वीय सहाय्यक
७. सचिव (पर्यावरण विभाग) मंत्रालय, मुबंई यांचे स्वीय सहाय्यक
८. संचालक, नगरपालिका प्रशासन, वरळी, मुबंई
९. संचालिका (पर्यावरण) )मंत्रालय, मुबंई
१०. संचालिका, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, अंधेरी, मुंबई.
११. विभागिय आयुक्त (सर्व विभाग)
१२. आयुक्त, सर्व महानगरपालिका
१३. जिल्हाधिकारी (सर्व)
१४. संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई.
१५. मुख्याधिकारी, नगरपालिका (सर्व)
१६. सर्व कार्यासने (पा.पु व स्व.वि) मंत्रालय, मुबंई
१७. निवडनस्ती पापु २२.


महापालिका आयुक्त कार्यालय
आवक क्रमांक ३१५२०
दिनांक 16 JAN 2002
पुणे महानगरपालिका

अति. महापालिका आयुक्त (ज.) कार्यालय, आवक क्र. ११२२९८
दिनांक 17 JAN 2002
पुणे महानगरपालिका